महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. ४६/प्रनिप्रा/ ४८४ दिनांक : 08 JUN 2021

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, **दिनांक २८ मे, २०२१ रोजी सकाळी ११:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या २४ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

१) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, .... सदस्य
माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
(दूरदृष्य प्रणालीद्वारे)

२) श्री. चिंतामणी जोशी (भा.प्र.से.), .... सचिव
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य.

१) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ३) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. ४) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. व ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

डॉ. राजीव मिश्रा, संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १ :** **खालील तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १) | कला शिक्षण | पदवी कला शिक्षण |

कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी त्यांचे क्रमांक डिओए-२०२१/तीन/९७८, दिनांक २७/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये "..........कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर कार्यालयातील कर्मचाऱ्यांची दैनंदिन उपस्थिती नियंत्रित करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणी दिनांक ११/०६/२०२१ पर्यंत कृपया मुदतवाढ मिळावी, अशी विनंती आहे." असे प्राधिकरणास कळविलेले आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतूदींचे अवलोकन केले असता, संबंधीत संचालकांनी प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून संबंधीत महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रवेश मंजुरीच्या प्रस्तावास अनुसरुन संचालनालयाने किती दिवसांत प्रवेश प्रमाणित करुन अहवाल सादर करावा, याबाबत कोणतेही निर्देश नाहीत, सबब वरील बाबी विचारात घेता सांगोपांग चर्चा करुन प्रवेश नियामक प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्देश दिले,-

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक कला शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांना सादर करणे अनिवार्य आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक कला शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी उक्त नमूद अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार प्रक्रिया केली नसल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट आहे. अधिनियम २०१५ मधील तरतूदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी या अनुषंगाने संबधीतांवर अधिनियम २०१५ मधील कलम क्रमांक २० अन्वये कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे व तद्नुषंगाने संबंधीत महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करता येणार नाही, याकरिता सर्वस्वी जबाबदार संबंधीत महाविद्यलयास ठरविण्यात येत आहे, तसेच या संदर्भात संबंधीत सर्व महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या दिनांक २५/०५/२०२१ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसला अनुसरुन त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय प्राप्त करुन घेण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना निर्देश देण्यात आले.

२) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक कला शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ०७/०५/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार कळविण्यात आलेले आहे, तथापि बहुतांशी महाविद्यालयांनी अद्याप प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला नाही, असे निर्दशनास आले आहे.



८/६/२१
(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

सद्यस्थितीतील कोविड-१९ विषाणूंच्या वाढत्या पादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क अदा करण्याकरिता संबंधीत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या दिनांक २५/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३१ मे २०२१ रोजी पर्यंत मूदत वाढ देण्यात येत आहे. या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावरुन उचित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

३) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक कला शिक्षण अभ्यासक्रमास एन.आर.आय./सी.आय.डब्ल्यु.जी. कोटयांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर पुनश्च तपासणी/छाननी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी नियमाप्रमाणे छाननी करुन अशा विद्यार्थ्यांचा अहवाल अध्यक्ष यांच्यामार्फत प्रवेश नियामक प्राधिकरणापुढे ठेवावा.

४) कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक कला शिक्षण अभ्यासक्रमांस प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची पडताळणी झालेली नसल्याने सदरील अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास सद्यस्थितीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील कला शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची पडताळणी/छाननी प्रक्रिया दिनांक १८/०६/२०२१ रोजी पर्यंत संचालनालय स्तरावर पुर्ण करण्यात येईल, असे डॉ. राजीव मिश्रा, संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केले, या अनुषंगाने संबंधीत अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते संदर्भात निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२१ रोजीच्या बैठकीत घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

<u>विषय क्रमांक ४ :</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

**अ) क्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत.**

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सेवापुरवठादार नियुक्तीच्या प्रकरणी ई-निविदा प्रक्रिया राबविली असून सदरील प्रक्रियेतुन सेवापुरवठादार नियुक्त करण्याकरिता किमान ०२ महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याचे प्राधिकरणास अवगत केले व या संदर्भात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांची नोंदणी प्रक्रिया तातडीने सुरु करण्याकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा अंतर्गत मे. सिन्थेसिस प्रा.लि., पुणे यांच्या सहकार्याने संगणीकृत प्रणाली अद्यावत करण्याचे कामकाज सुरु आहे, तसेच सदरील कामाकरिता मे. सिन्थेसिस प्रा.लि., पुणे हे मोफत सेवा देणार असे विदीत केले आहे. प्रस्तूत प्रकरणी तातडीचे एक विशेष बाब म्हणुन उक्त नमूद प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता मिळण्याची विनंती केली.

उक्त बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षाकरिता सीईटी कक्षाच्या स्तरावर मे. सिन्थेसिस प्रा.लि. ,पुणे यांच्या सहकार्याने प्रक्रिया सुरु करण्यास प्राधिकरणाने तातडीचे विशेष बाब म्हणुन मान्यता प्रदान केली. तसेच सदरील



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य
8/6/2

प्रक्रिया पुर्ण पणे गुणवत्ता व पारदर्शक पध्दतीने राबविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मे. सिन्थेसिस यांनी सीईटी कक्षास विनामूल्य सेवा देण्याच्या त्यांच्या या उल्लेखनिय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. या संदर्भात् शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता राबविण्यात येणाऱ्या ई-निविदा प्रक्रिये मध्ये मे. सिन्थेसिस यांनी सहभाग घेतल्यास त्यांना नियमानुसार प्राधान्य देण्यात येईल.

वरीलप्रमाणे विषय/अभ्यासक्रमनिहाय सांगोपांग चर्चा झाली, तसेच सद्यस्थितीमध्ये उद्भवलेल्या कोरोना विषाणूच्या संक्रमणामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच तांत्रिक अडचणीमुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता प्राधिकरणास ऑनलाईन पोर्टल उपलब्ध नसताना अल्प कालावधीमध्ये कला शिक्षण संचालनालय, मुंबई व प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 8/6/21